**ठळक बातम्या**

- राष्ट्रपतींचं अभिभाषण विकसित भारताच्या संकल्पाला अधिक मजबूत करणारं असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी उद्या मतदान

- गुजरातमधे समान नागरी कायदा लागू करण्याच्या दृष्टीने ५ सदस्यांची समिती स्थापन

**आणि**

- देशातल्या क्रीडा संस्थांची कार्यपद्धती सुधारण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**<><><><><>**

राष्ट्रपतींचं अभिभाषण विकसित भारताच्या संकल्पाला अधिक मजबूत करणारं, नवा विश्वास निर्माण करणारं आणि जनतेला प्रेरणा देणारं होतं, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावरल्या चर्चेला उत्तर देताना ते आज लोकसभेत बोलत होते. गेल्या दहा वर्षात २५ कोटी नागरिक गरिबी रेषेच्या वर आले, या कार्यकाळात गरीबांना चार कोटी घरं मिळाली असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. गेल्या दहा वर्षात बारा कोटी घरांत शौचालय आणि बारा कोटी घरांना नळजोडणी दिली गेली याचा उल्लेखही त्यांनी केला. आधीच्या सरकारच्या काळात निधीचा मोठा अपहार होत असल्याचं

सांगत मोदींनी केंद्र सरकारची प्राथमिकता जनता आहे, असं सांगितलं. सरकारने योग्य लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचवल्या असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट- नरेंद्र मोदी**

केंद्र सरकारच्या स्वच्छता अभियानाचा प्रधानमंत्र्यांनी आवर्जून उल्लेख केला. आयुष्मान योजनेमुळे जनतेची एक लाख वीस हजार कोटी रुपये बचत झाली, जनऔषधी केंद्रामुळे तीस हजार कोटी बचत होत असल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं. मोफत अन्नधान्य योजना, मोफत वीज योजनेमुळेही जनतेची कोट्यवधींची बचत होत आहे, असं सांगून १२ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कर माफ केल्याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी केला. पायाभूत सुविधांसाठी ११ लाख कोटी रुपये निधीची तरतूद केंद्र सरकारनं केली असंही त्यांनी सांगितलं. देश तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रगती करत आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी सांगितलं.  भारत डीपटेक क्षेत्रात पुढे जात आहे, आण्विक ऊर्जा क्षेत्र खुलं केलं आहे, असं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं.

प्रधानमंत्र्यांच्या भाषणानंतर लोकसभेनं राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरचा आभारप्रस्ताव स्वीकारला आणि कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><><>**

कृषीविषयक योजनांमधे कोणतीही अनियमितता सहन केली जाणार नाही, तसंच प्रधानमंत्री पिक विमा योजनेत जर भ्रष्टाचार झाला असेल तर त्याची चौकशी केली जाईल, आणि दोषींवर कारवाई केली जाईल, असं आश्वासन केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज लोकसभेत दिलं. महाराष्ट्रात पिकविमा योजनेत गेल्या सरकारच्या काळात भ्रष्टाचार झाल्याचं वक्तव्य राज्याचे कृषी मंत्री शिवाजीराव कोकाटे आणि भाजपा आमदार सुरेश धस यांनी केल्याचं खासदार सुप्रिया सुळे

यांनी लोकसभेत सांगितलं. याबाबत सुळे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना चौहान बोलत होते.

महाराष्ट्र सरकारनं पिकविमा योजनेच्या सुधारणेसाठी पावलं उचलली आहेत, देशातल्या शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं चौहान यांनी सांगितलं. सरकारनं २०१९ पासून उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा गृहित धरून किमान हमीभाव ठरवले आहेत, असं ते म्हणाले. नारळ उत्पादनात भारत जगात पहिल्या क्रमांकाचा देश बनल्याचा उल्लेखही यावेळी चौहान यांनी केला.

**<><><><><>**

देशात उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाची मान्यता मिळालेल्या स्टार्टअप्सची संख्या गेल्या वर्ष अखेरीपर्यंत १ लाख ५७ हजाराच्या वर गेल्याचं वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितीन प्रसाद यांनी आज लोकसभेत एका लेखी उत्तरात सांगितलं. २०१६ मध्ये स्टार्टअप इंडियाची स्थापना झाल्यापासून त्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरकारने विविध उपक्रम हाती घेतल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

निर्यात प्रोत्साहन विकेंद्रीकरण उपक्रमांचा भाग म्हणून, देशभरातल्या ५९० जिल्ह्यांसाठी जिल्हा निर्यात कृती आराखडा तयार करण्यात आल्याचं त्यांनी आणखी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.

**<><><><><>**

तेल उत्पादक कंपन्यांचे किरकोळ विक्रेता म्हणून देशातल्या २६ प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांची निवड केली आहे. केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली. पेट्रोलियम मंत्रालयाने त्याकरता दिशानिर्देशांमधे आवश्यक बदल केले आहेत असं ते म्हणाले.

**<><><><><>**

वर्षभरासाठी दिल्या जाणाऱ्या आयुष व्हिसाचा वापर करून परदेशी व्यक्तींना ३ वेळा देशात प्रवेश करता येतो. केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज राज्यसभेत लेखी उत्तरात ही माहिती दिली. हा व्हिसा वार्षिक तत्त्वावर ५ वर्षांसाठी वाढवता येतो. रुग्णालयाच्या सल्ल्यानुसार हा निर्णय घेतला जातो, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू उत्पादनात गेल्या वर्षात भारतानं लक्षणीय प्रगती केल्याची माहिती केंद्रीय मंत्री इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमधून दिली.

देशात २०१४ मध्ये केवळ दोन मोबाईल उत्पादन करणाऱ्या कंपन्या होत्या आजमितीला ही संख्या ३०० हून अधिक झाल्याची माहिती वैष्णव यांनी दिली. तर २०१४ मध्ये मोबाईल उत्पादनाचं मूल्य १८ हजार ९०० कोटी रुपये होते तर २०२४ मध्ये हे मूल्य ४ लाख २२ हजार कोटी रुपये इतके झाल्याचंही त्यांनी सांगितलं. मोबाईल उत्पादन करणाऱ्या कंपन्यांमध्ये वाढ झाल्यामुळे या क्षेत्रात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सुमारे १२ लाख रोजगार निर्मिती झाली आहे. केंद्र सरकारच्या मेक इन इंडिया या मोहिमेअंतर्गत आत्मनिर्भर आणि स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन दिलं जात असल्यानं रोजगार निर्मिती होत असल्याचंही वैष्णव यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी उद्या मतदान होत आहे. सकाळी सात ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. या निवडणुकीसाठी एकूण ६९९

उमेदवार रिंगणात असून १ कोटी ५६ लाखांहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी यासाठी चोख बंदोबस्त करण्यात आला असून, निवडणूक आयोगानं १ लाख ८० हजारापेक्षा जास्त कर्मचारी तैनात केले आहेत.

गेल्या २४ तासांत पोलिसांनी केलेल्या प्रतिबंधात्मक कारवाईत १४ जणांना अटक केली असून २५ जणांविरोधात FIR दाखल केला आहे. भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांखाली ३४० जणांविरोधात, तर अबकारी कर प्रकरणी २७८ जणांना अटक केल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली. दरम्यान, हरियाणा सरकारनं उद्या दिल्लीतल्या नोंदणीकृत मतदारांसाठी भरपगारी सुट्टी जाहीर केली आहे.

**<><><><><>**

गुजरातमधे समान नागरी कायदा लागू करण्याच्या दृष्टीनं तिथल्या सरकारने ५ सदस्यांची एक समिती स्थापन केली आहे. सर्वोच्च न्यायालयातून निवृत्त झालेल्या न्यायमूर्ती रंजना देसाई समितीच्या प्रमुख पदी आहेत. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनी आज गांधीनगर इथं पत्रकारपरिषदेत सांगितलं की, ही समिती इस्लामसह विविध धर्मसमुदायांच्या नेत्यांशी सल्लामसलत करेल. निवृत्त प्रशासकीय अधिकारी सी एल मीणा, ज्येष्ठ वकील आर सी कोदेकर, दक्षिण गुजरात विद्यापीठाचे माजी कुलगुरु दक्षेश ठाकर आणि सामाजिक कार्यकर्त्या गीता श्रॉफ हे समितीचे इतर सदस्य आहेत. गुजरातमधल्या विरोधी पक्ष नेत्यांनी या बाबत टीका केली आहे. भाजपाला विविध समुदायांमधे फूट पाडायची असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे.

**<><><><>**

देशातल्या क्रीडा संस्थांमधील एकहाती सत्ता संपवून त्यांची कार्यपद्धती अधिक स्वायत्त, स्वतंत्र आणि न्याय्य व्हावी म्हणून कठोर उपाययोजना करावी लागेल असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. आशियाई कबड्डी महासंघाच्या अध्यक्षांनी भारतीय हौशी कबड्डी महासंघाच्या प्रशासकांना लिहिलेल्या अपमानकारक पत्राची दखल घेऊन महाधिवक्ता तुषार मेहता यांना सूचना देताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती कोटीश्वर सिंग यांनी आज हे वक्तव्य केलं. इराण इथं होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कबड्डी स्पर्धांमध्ये भारताच्या संघाला सहभागी होण्यात येणाऱ्या अडचणींच निवारण करण्याच्या सूचनाही न्यायालयानं मेहता यांना दिल्या.

**<><><><>**

नवी दिल्लीत भारत मंडपम इथे १४ ते १७ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या भारत टेक्स २०२५ या प्रदर्शनामुळे वस्त्रोद्योगासाठी कच्च्या मालाचा विश्वसनीय पुरवठादार तसेच गुंतवणुकीसाठी सर्वात फायदेशीर देश म्हणून भारताचं स्थान बळकट होईल, असं केंद्रीय वस्त्रोद्योग सचिव नीलम शमी राव यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होत्या.

**<><><><>**

मुंबईत २४ कॅरेट सोन्याच्या किमती आज तोळ्यामागे पहिल्यांदाच ८५ हजाराच्या पलीकडे गेल्या. मुंबईत आज २४ कॅरेट सोन्याची किंमती प्रतितोळा ८५ हजार ५९३ रुपये होती. २२ कॅरेट सोनं ८३ हजार १०० रुपये तोळा दरानं मिळत होतं.

**//<><><><><>//**